## फौजदारी किरकोळ अर्ज क्र. २०/२०२४ मधील निशाणी ०५ वरील आदेश

०१. अर्जदार क्र.१ ते ३ यांनी प्रस्तुतचा भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम १४४ अन्वये गैरअर्जदारकडून रक्कम रु.५,०००/- प्रत्येकी इतकी अंतरिम पोटगी मुळ अर्जाच्या अंतिम निकालापर्यंत मिळणेसाठी केला आहे.

०२. अर्जदार हिने मुळ अर्जामध्ये असे कथन केले आहे की, अर्जदार क्र.१ चा आणि गैरअर्जदारचा विवाह मुस्लीम धर्मशास्त्राप्रमाणे दि.०६/०५/२०१० रोजी इंदापूर येथे झाला. विवाहानंतर गैरअर्जदार यांनी तिला शारिरीक व मानसिक त्रास दिला. त्यामुळे अर्जदार दिनांक २०/०६/२०१८ रोजीपासुन तिचे माहेरी राहत आहे.

०३. प्रस्तुत अर्जामध्ये असे कथन केले आहे की, अर्जदार यांना या न्यायालयाने ओ.एम.ए. क्र.४५१/२०१८ मध्ये एकूण रक्कम रु.८,०००/- दरमहा निर्वाह भत्ता व घरभाडे मंजूर केले होते. परंतू सदर आदेशास बारामती येथील मा. सत्र न्यायालयाने अपिलामध्ये स्थगीती दिली व गैरअर्जदार यांनी सदर आपिलाचा अंतिम निकाल लागेपर्यंत दरमहा रक्कम रु.३,०००/- देण्याचा आदेश पारित केलेला आहे. परंतू सदर आदेशाप्रमाणे अद्यापपर्यंत गैरअर्जदार यांनी काहीएक रक्कम भरलेली नाही. तसेच सदर रक्कम रु.३,०००/- मध्ये अर्जदाराचे भागणार नाही. त्यामुळे अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

०४. गैरअर्जदार प्रस्तुत प्रकरणात हजर झाला. गैरअर्जदारच्या विधीज्ञांनी त्यांचे म्हणणे सि.आय.एस. प्रणालीवर अपलोड केले असल्याचे मागील तारखेस व आजरोजी कथन केले. मात्र सदर प्रणालीवर आजरोजी सायंकाळी ५:३० पर्यंत गैरअर्जदार यांचे म्हणणे दिसून आले नाही.

०५. पुढील मुद्दे माझे विचारार्थ निश्चित होत असून त्यावरील निष्कर्ष मी कारणमीमांसेसह पुढीलप्रमाणे देत आहे.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार हे प्रस्तुत अर्जानुसार अंतरिम निर्वाहभत्ता मिळण्यास पात्र आहेत काय ? | नाही. |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमीमांसा

**मुद्दा क्र. १ बाबत–**

०६. अर्जदार व गैरअर्जदार यांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला व अभिलेखावरील कागदपत्रे पाहिली.

०७. अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांचा विवाह झाल्याची बाब निर्विवाद राहीलेली आहे. तसेच अर्जदार दिनांक २०/०६/२०१८ पासून तिच्या माहेरी रहात

आहे ही बाब देखील निर्विवाद राहीलेली आहे. अर्जदार यांना या न्यायालयाने ओ.एम.ए. क्र.४५१/२०१८ मध्ये एकूण रक्कम रु.८,०००/– दरमहा निर्वाह भत्ता व घरभाड्याची रक्कम मंजूर केली आहे. परंतू सदर आदेशास बारामती येथील मा. सत्र न्यायालयाने अपिलामध्ये स्थगीती दिली व गैरअर्जदार यांनी सदर आपिलाचा अंतिम निकाल लागेपर्यंत दरमहा रक्कम रु.३,०००/– देण्याचा आदेश पारित केलेला आहे.

०८. भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम १४४ नुसार पुरेशी ऐपत असताना जर कोणत्याही इसमाने स्वतःचा निर्वाह करण्यास असमर्थ असणा-या आपल्या पत्नीचा निर्वाह करण्याबाबत उपेक्षा केली किंवा तो करण्यास नकार दिला तर न्यायदंडाधिकारी सदर इसमाने त्याच्या पत्नीच्या निर्वाहाकरीता योग्य वाटेल त्या मासिक दराने मासिक भत्ता द्यावा असा आदेश करु शकेल. त्याचप्रमाणे अशा प्रकरणात न्यायदंडाधिकारी अंतरीम निर्वाह भत्ता देण्याबाबतचा आदेश देखील पारीत करु शकेल.

०९. मुळ अर्जामध्ये अर्जदार यांनी अर्जास कारण असे नमूद केले आहे की, फौजदारी किरकोळ अर्ज क्र.४५१/२०१८ मधील निर्वाह भत्याच्या आदेशानंतरही गैरअर्जदार रक्कम भरत नाही. गैरअर्जदारने अर्जदार यांच्या उदरनिर्वाहाची सोय केली नाही त्यामुळे अर्जास कारण घडले. अर्जदार यांना फौजदारी किरकोळ अर्ज क्र.४५१/२०१८ मध्ये निर्वाह भत्ता व घरभाडयाची रक्कम रु.८,०००/- दरमहा मंजूर झालेली आहे. प्रस्थापित तत्वानुसार, सदर रक्कम प्रस्तुतचा अर्ज निकाली करतेवेळेस विचारात घेणे आवश्यक आहे. मा. सत्र न्यायालयाने सदर आदेशास जरी स्थगीती दिली असेल तरी सदरचा आदेश रद्द बातल ठरविण्यात आलेला नाही. मा. सत्र

न्यायालयाने दरम्यानच्या काळात  गैरअर्जदार यास दरमहा रक्कम रु.३,०००/- निर्वाह भत्ता अर्जदार यांना देण्याबाबत आदेश पारित केला आहे. गैरअर्जदार हा सदरची निर्वाह भत्याची रक्कम भरत नाही या कारणास्तव प्रस्तुतचा अर्ज व मुळ अर्ज दाखल करता येत नसल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. सदर रक्कम वसुल करण्याकरीता योग्य त्या कायदेशीर प्रक्रियेची तरतुद भारतीय नागरीक सुरक्षा संहितेमध्ये आहे. सदर प्रक्रियेचा अवलंब अर्जदारने करणे आवश्यक आहे.

१०. त्याचप्रमाणे अर्जदारास मंजूर करण्यात आलेली वरीलप्रमाणेची निर्वाह भत्याची व घरभाडयाची रक्कम अपुरी आहे असे अर्जदारचे कथन नाही. त्यामुळे मा. सत्र न्यायालयात अपिल  प्रलंबीत असताना प्रस्तुत प्रकरणात भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम १४४ नुसार अतिरीक्तची निर्वाह भत्याची रक्कम मंजूर करणे या टप्प्यावर योग्य व न्यायोचि होणार नाही असे मी समजतो. सबब, मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नाही असे नोंदवितो.

**मुद्दा क्र. २ बाबत–**

११. मुद्दा क्र. १ च्या निष्कर्षानुसार मी मुद्दा क्र. २ च्या उत्तराकरीता पुढील प्रमााणे आदेश पारीत करीत आहे.

<u>आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

BARTAKKE PRADEEP CHANDRAKANT
Digitally signed by BARTAKKE PRADEEP CHANDRAKANT
Date: 2025.06.19 16:16:07 +0530

इंदापूर .
दिनांक १८/०६/२०२५

(प्र.चं.बारटक्के)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, इंदापूर.